● सोमवार, दि २३ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ६२ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# मराठा समाजाच्या भावनांचा अंत पाहू नका !






## मागण्या लवकरात लवकर मान्य करण्यासह मनसेच्या खटकेवर गुन्हा दाखल करण्याची मागणी; जालना जिल्ह्यात बंदला प्रतिसाद

**जालना । प्रतिनिधी -** मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे हे दि १६ सप्टेंबरपासून अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला बसले आहेत. जरांगे यांची तब्येत दिवसेंदिवस खालावत चालली आहे. रविवार (दि २२) उपोषणाचा सहावा दिवशी जालना जिल्हा बंदचे आवाहन मराठा समाजाच्यावतीने करण्यात आले होते. यास उत्तम प्रतिसाद मिळाला असून जिल्ह्यातील इतर तालुक्यातही बंद पाळण्यात आला. मराठा समाजाच्या भावनांचा अंत पाहू नका अन्यथा उद्रेक होईल असा इशारा ही मराठा आंदोलकांकडून देण्यात आला. तसेच लवकरात लवकर मागण्या मान्य करा व मनसेचे बळीराम खटके यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करा अशी मागणी यावेळी आंदोलकांकडून लावून धरण्यात आली.

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण, मराठा समाजातील युवक व इतरांवर झालेले गुन्हे मागे घेण्यात यावे यासह विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे आमरण उपोषणाला बसलेले आहेत. जरांगे यांच्या उपोषणाचा आज सहावा दिवस असून त्यांना पाठींबा देण्यासाठी जालना जिल्हा बंदचे आवाहन मराठा समाज बांधवांच्यावतीने करण्यात आले होते. यास जालन्यातील व्यापाऱ्यांसह सर्वच स्तरातील नागरिकांनी पाठींबा देत आपली आस्थापने बंद ठेवली होती.

सरकारने लवकरात लवकर मागण्या पूर्ण करावयात अन्यथा समाजाच्या भावनाचा उद्रेक होईल अशी प्रतिक्रिया मराठा आंदोलक प्रशांत वाडेकर यांनी दिली. शहरातील कृषि उत्पन्न बाजार समिती चौकात मराठा आंदोकांनी टायर जाळून राज्य सरकारचा निषेध व्यक्त केला. यावेळी श्री वाडेकर यांनी प्रतिक्रिया दिली ते म्हणाले की, आज मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा सहावा दिवस आहे. सरकारने लवकरात लवकर मागण्या पूर्ण करावयात अन्यथा मराठा समाजाच्या भावनांचा उद्रेक होईल व याची संपूर्ण जबाबदारी ही राज्य सरकारची राहील असेही श्री वाडेकर यावेळी म्हणाले.

मनसेचे नेते बळीराम कटके यांच्यावर गुन्हा दाखल करा या मागणीसाठी चंदनझिरा पोलीस ठाण्यात मराठा समाजाच्या आंदोलकांनी ठिय्या मांडला होता. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या झेंडा फाडल्याचा आरोप मनसेचे बळीराम खटके यांच्यावर करण्यात आला असून हा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अवमान असून यासाठी बळीराम खटके यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी लावून धरत चंदनझिरा पोलीस ठाण्यात मराठा आंदोलकांनी ठिय्या मांडला. प्रसंगी ठाण्याचे पोलीस निरीक्ष सम्राटसिंग राजपूत यांनी आंदोलकांचे निवेदन स्विकारले त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.





युवा आदर्श

**कन्या ...**

कायदे सक्षम कडक
नको गर्भलिंग चाचणी
मुलगी जन्मली तरीही
आता न लागे टोचणी
बेटी बचाव योजनेतून
हिरकणी शोभे कोंदणी
स्वागत वाजत गाजत
उदेली शुक्राची चांदणी
सुकन्या समृध्दी खाते
गं अमृत भरते रांजणी
विवाह सहज साधतो
शोभे सजना साजणी
महिला सुरक्षा व्यवस्था
संरक्षित आता हरिणी
उज्वला समानप्रकल्प
खुशीत नांदते गृहिणी
समाज बने जागरूक
निर्भये फिरती बहिणी
वनिता आरक्षण प्रदान
घाले यशस्वी गवसणी
महिला पुरुष समानता
बदलती विचार सरणी
सन्मान दोघांस समान
आकाश आणि धरणी
संसार सुखात दोघांचा
सक्रीय ती सहचारिणी
अन्याया विरुद्ध लढता
बनते दुर्गा उग्रचारिणी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## जरांगे यांच्या उपोषणास पाठिंबा म्हणून परतूर कडकडीत बंद



**परतूर । प्रतिनिधी -** मराठा आरक्षण संघर्ष योध्दा मनोज जरांगे यांच्या अंतरवाली सराटी येथे सुरू असलेल्या अमरण उपोषणास पाठिंबा म्हणून रविवार (दि २२) रोजी परतूरात कडकडीत बंद पाळण्यात आला. अंतरवाली सराटीत मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजास ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळण्यासाठी अंतरवाली सराटी येथे अमरण उपोषण सुरू केले आहे.या उपोषणास पाठिंबा म्हणून परतूर येथील मराठा बांधवांनी शहरात बंद ची हाक देत मोटारसायकल वर रॅली काढून एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत संपूर्ण परिसर दणाणून सोडला होता. यावेळी प्रा. पांडूरंग नवल, समाजसेवक दत्ता अंभुरे, आबासाहेब कदम, दत्ता सुरूंग, डॉ.प्रदिप चव्हाण, अशोक तनपूरे, रामजी खवल, राजेश भुजबळ, बाबुराव हिवाळे, परमेश्वर बिल्हारे यांच्यासह मराठा समाज बांधव उपस्थित होते.

## कर्मयोगी अंकुशराव टोपे जयंतीनिमित्त साहित्यिकांचा गौरव सोहळा

### कवी ज्ञानेश वाकुडकर यांची 'सखी साजनी' काव्यमैफल

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील यशवंतराव चव्हाण साहित्यिक व सांस्कृतिक प्रतिष्ठान आणि माजी विद्यार्थी मत्स्योदरी शिक्षण संस्था जालना आयोजित कर्मयोगी अंकुशराव टोपेसाहेब यांच्या जयंतीनिमित्त ख्यातनाम कवी ज्ञानेश वाकुडकर यांच्या 'सखे साजनी' या काव्यमैफल आणि साहित्यिकांचा गौरव समारंभ बुधवारी (ता.२५) सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला आहे.



शहरातील मंठा चौफुली परिसरातील कलश सीड्स सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार तथा यशवंतराव चव्हाण साहित्यिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेश टोपे हे राहणार आहेत. कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष शिवकुमार बैजल यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमात लेखिका रेखा बैजल,रावसाहेब ढवळे, कादंबरीकार छबुराव भांडवलकर, कवी राम गायकवाड, **पान २ वर**

# उपहासात्मक टिकेनंतर फलकाची झाली दुरूस्ती

### आ. गोरंट्याल यांचे पायदळी भासत असलेले नाव हटविले

**जालना । प्रतिनिधी -** गोरंट्याल यांच्या परिवाराच्या संकल्पनेतून जालना कृषि महोत्सव २०२४ चे डॉ. फ्रेजर बॉईज मैदान येथे दि २० ते २३ सप्टेंबर २०२४ दरम्यान आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमानिमित्ताने उभारण्यात आलेल्या भव्य मंडपाच्या आगमनाच्या ठिकाणी आ. कैलास गोरंट्याल यांचे भले मोठे कटाऊट लावण्यात आलेले होते. या कटाऊटमध्ये आ. गोरंट्याल हे त्यांच्या नावालाच पायदळी तुडवत असल्याचे भासते. या संदर्भात उपहासात्मक वृत्त फोटोसह युवा आदर्शने प्रकाशित केले होते. यावर आयोजन समिती खडबडुन जागी झाली. कटाऊट, फलकाचे काम देण्यात आलेल्या एजन्सीला धारेवर धरल्यानंतर या एजन्सीने सुधारणा केली आहे. आ. कैलास गोरंट्याल यांचे नावच या ठिकाणाहून हटविण्यात आलेले आहे.




पुर्वीचे छायाचित्र...




बदल करण्यात आल्यानंतरचे छायाचित्र...

### भारताने ९७ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच जिंकले सुवर्णपदक

## चेस ऑलिम्पियाडमध्ये डी गुकेशची चमकदार कामगिरी

**नवी दिल्ली -** भारताचा बुद्धिबळपटू डी गुकेशने बुद्धिबळ ऑलिम्पियाड २०२४ मध्ये इतिहास घडवला आहे. अंतिम सामन्यात त्याने शानदार खेळ केला आणि भारतासाठी सुवर्णपदक जिंकले. डी गुकेशने आता ४५व्या ऑलिम्पियाडमध्ये चमकदार कामगिरी करत संपूर्ण जगात भारताचे नाव उंचावले आहे. गुकेशने चेस ऑलिम्पियाडमधील ८ सामने जिंकले तर २ ड्रॉ सामने खेळले. संपूर्ण स्पर्धेत गुकेशने चमकदार कामगिरी करत बुद्धिबळ संघाला कायमच पाठिंबा दिला.

बुद्धिबळ ऑलिम्पियाड २०२४ मध्ये खुल्या विभागात भारताने ऐतिहासिक पहिल्या सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केला आहे. भारतीय संघात गुकेश डी, आर प्रज्ञानंद, अर्जुन इरिगसी, विदित गुजराथी, पेंटाला हरिकृष्ण आणि **पान २ वर**

# संपादकीय

## एक देश एक निवडणूक

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या शिफारशीनुसार एक देश एक निवडणूक या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकतीच मंजुरी दिली. या समितीने लोकसभा निवडणुका जाहीर होण्यापूर्वी सादर केलेला अहवाल मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात आला होता. २०२९ पासून लोकसभा आणि राज्य विधानसभा तसेच स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याची शिफारस विधी आयोगाकडून केली जाण्याची शक्यता आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने एक देश एक निवडणूक शिफारशीला मान्यता दिल्यानंतर ही संकल्पना भारतासारख्या खंडप्राय आणि जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या देशात शक्य आहे का? यावर चर्चा घडू लागली आहे. एक देश एक निवडणूक म्हणजे सर्व निवडणुका एकाच वेळी होणे. अगदी ग्रामपंचायती पासून लोकसभेपर्यंत सर्व निवडणुका एकाच वेळी घेणे. अर्थात हे शक्य नसल्यानेच कोविंद समितीने लोकसभा व विधानसभा निवडणुका एकाच वेळी घ्याव्यात व त्यानंतरच्या १०० दिवसात स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका घेण्यात याव्यात अशी तरतूद शिफारसीत केली आहे. अर्थात देश स्वातंत्र्य झाल्यावर पहिल्या चार निवडणुका म्हणजे १९५२, १९५७, १९६२ आणि १९६७ साली झालेल्या निवडणुका या एकत्रच लढल्या गेल्या आहेत. मात्र १९६८ आणि १९६९ साली काही राज्यातील सरकारे बरखास्त करण्यात आली त्यामुळे ही परंपरा खंडित झाली. तसेच १९७० साली मुदतीपूर्वीच लोकसभा विसर्जित करण्यात आली त्यामुळे देशात एकत्र निवडणुका होऊ शकल्या नाहीत. अर्थात एक देश एक निवडणूक ही संकल्पना अतिशय चांगली आहे. एक देश एक निवडणूक झाल्यास पैशाची व वेळेची मोठी बचत होईल. आपल्याकडे लोकसभे सारख्या मोठ्या निवडणुका असल्या की जवळपास दोन महिने सोहळा चालतो. त्याच्या आधी दीड दोन महिने आचारसंहिता. त्यानंतर विधानसभा, स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका अशा कोणत्या ना कोणत्या निवडणुका वर्षभर चालूच असतात. प्रत्येक निवडणुकी आधी महिना दीड महिना आचारसंहिता असते त्यामुळे विकासकामांना खीळ बसते. शिवाय देशात निवडणुकीवर हजारो कोटींचा खर्च होतो. यावर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीचा खर्च अमेरिकेतील राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीत होणाऱ्या खर्चापेक्षा अधिक होता. हा खर्च फक्त लोकसभा निवडणुकीचा आहे. विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणुकीवर देखील असाच अवाढव्य खर्च होतो. एक देश एक निवडणूक झाली तर देशाचा पैसा आणि वेळही वाचेलच त्यासोबतच विकास कामांना खीळही बसणार नाही. मात्र एक देश एक निवडणूक ही संकल्पना कितीही लोभस वाटत असली तरी तिची अंमलबजावणी करणेही तितके सोपे नाही. मुळात भारतासारख्या खंडप्राय देशात जिथे एक अब्जाहून अधिक मतदार आणि शेकडो राजकीय पक्ष आहेत तिथे ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे ही मोठी तारेवरची कसरत आहे. एक देश एक निवडणूक ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी केवळ केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरीच पुरेशी नाही तर त्यासाठी घटना दुरुस्ती करावी लागेल. सरकारला जर ही घटना दुरुस्ती करायची असेल तर सर्व पक्षाचा पाठिंबा मिळवावा लागेल. आज या संकल्पनेला काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांचा विरोध आहे. एक देश एक निवडणूक ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सरकारला सर्व पक्षांची मनधरणी करावी लागेल सर्वच पक्ष त्यासाठी तयार होतीलच असे नाही कारण अनेक राज्यात विरोधी पक्षांची सरकारे आहेत जर ही संकल्पना प्रत्यक्षात आणायची असेल अनेक राज्यातील विधानसभांचा कालावधी वाढवावा किंवा कमी करावा लागेल. ज्या राज्यातील विधानसभेचा कालावधी कमी करायचा असेल तेथील सरकार बरखास्त करावे लागेल आणि जिथे वाढवायचा असेल तिथे राष्ट्रपती राजवट आणावी लागेल त्यासाठी तेथील सरकार तयार होईलच असे नाही यासाठी सरकारला सर्व पक्षांची सहमती घडवून आणावी लागेल. तूर्त ती शक्यता धूसरच दिसते. विरोधी पक्ष त्यासाठी सहजासहजी तयार होईल असे वाटत नाही. त्यामुळे केंद्रीय मंत्रिमंडळाने हा प्रस्ताव मंजूर केला तरी त्याला सर्व सहमती मिळेल असे वाटत नाही.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

प्रसादाच्या लाडूत चरबीचे तेल मिसळविणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी

# हे हिंदूंना धर्मभ्रष्ट करण्याचे षड्यंत्रच - सुनील घनवट




**मुंबई । प्रतिनिधी** - जगभरातील कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री तिरुपती बालाजी मंदिरातील प्रसादाच्या लाडूमध्ये प्राण्यांच्या चरबीचा वापर केला जात असल्याची अत्यंत गंभीर बाब आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी उघड केल्यावर जगभरातील हिंदू समाजामध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. प्रसादामध्ये प्राण्यांच्या चरबीचे तेल मिसळणे, ही केवळ भेसळ नसून हिंदूंच्या धर्मश्रद्धेवर जाणीवपूर्वक केलेला धार्मिक आघात आहे. हा प्रकार म्हणजे हिंदूंशी केलेला विश्वासघातच आहे.

माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांचे वडील सॅम्युअल राजशेखर रेड्डी हे मुख्यमंत्री असतांना श्री तिरुपती बालाजी मंदिराचे पवित्र लाडू बनवण्याचे कंत्राट एका ख्रिस्ती आस्थापनाला देण्यात आले होते, मंदिराच्या विश्वस्तपदी ख्रिस्ती व्यक्तींना नेमले गेले होते, मंदिर परिसरात ख्रिस्ती मिशनर्यांच्या धर्मांतराला प्रोत्साहन दिले गेले आदी अनेक पापे त्या काळात करण्यात आली. त्याचाच पुढचा भाग म्हणजे या प्रसादाच्या लाडूत चरबीचे तेल मिसळून हिंदूंना धर्मभ्रष्ट करण्याचे षड्यंत्र रचले गेले, असे प्रतिपादन मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी केले. ज्यांनी हे महापाप केले आहे, त्यांच्यावर धार्मिक भावना दुखावल्या प्रकरणी गुन्हे दाखल करून त्यांना तत्काळ अटक करावी, अशी मागणीही श्री. घनवट यांनी केली. याविषयी महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने मुंबई येथील दादर (पू.) रेल्वे स्थानकाजवळ आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी मंदिर महासंघाचे सदस्यांसह, भाविक आणि हिंदुत्वनिष्ठ उपस्थित होते.

आता केवळ या प्रसादाच्या लाडूच्या प्रकरणाचीच नव्हे, तर जगनमोहन रेड्डी सरकार आणि त्यांचे वडील सॅम्युअल राजशेखर रेड्डी यांच्या कार्यकाळात तिरुपति मंदिराशी निगडीत घेतलेल्या सर्वच निर्णयांची सखोल चौकशी करण्यात यावी. त्यातील जे हिंदु धर्मविरोधी निर्णय घेतले असतील, ते सर्व तात्काळ रहित करण्यात यावेत, अशी मागणी 'मंदिर महासंघा'ने आंध प्रदेश सरकारकडे केली आहे.

हे प्रकरण म्हणजे मंदिर सरकारीकरणाचा सर्वांत मोठा दुष्परिणाम म्हणता येईल. देशभरातील सर्वच मंदिरांमध्ये अशा प्रकारे धर्मभ्रष्टता वा हिंदु धर्मविरोधी कृती तर होत नाहीत ना, याची तपासणी करण्याची वेळ आली आहे. काही दिवसांपूर्वी उत्तर प्रदेशमध्ये कावड यात्रेत सहभागी भक्त ज्या हॉटेल वा धाब्यावर थांबत होते, त्यांच्या जेवणामध्ये थुंकणे, लघुशंका करणे आदी विकृती समोर आल्या होत्या. तसेच अनेक मंदिरांच्या बाहेर देवाला अर्पण करण्यात येणारी फुले आणि हार यांनाही थुंकी लावण्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. केवळ 'थूंक जिहाद'च नव्हे, तर सध्या मुंबईतील श्री सिद्धीविनायक मंदिरापांसून केरळमधील अनेक मंदिरांमधील देवाचा प्रसाद हा 'हलाल उत्पादनां'पासून बनवण्याचा प्रकार समोर आला.

धर्मपरायण हिंदू कदापि हे सहन करू शकत नाहीत. भारतीय राज्यघटनेने प्रत्येकाला धर्माचरणाचे स्वातंत्र्य दिलेले असतांना त्यात अशा प्रकारे बाधा आणणे, हा गंभीर अपराध आहे. हिंदूंच्या धार्मिक अधिकारांचे रक्षण करणे, हे सरकारचे दायित्व आहे. मंदिरांमध्ये देण्यात येणारा प्रसाद हा सात्त्विक, शुद्ध, पवित्र तर असावाच, मात्र तो बनवण्यापासून वितरण व्यवस्थेतील प्रत्येक जणही धर्मपरायण हिंदु असावा, अशी मागणी करण्याची वेळ आज आली आहे. यासाठी हिंदु समाजाने उठाव करून आपली मंदिर संस्कृती भ्रष्ट होण्यापासून वाचवायला हवी, असेही सुनील घनवट यांनी म्हटले आहे.

# उपयुक्त वॉटरप्रूफ मेकअप टिप्सचा अवलंब करा

नवरात्रीच्या काळात गरबा आणि दांडियाची लोक आतुरतेने वाट पाहत असतात. मुली खूप आधीपासून तयारी करायला लागतात आणि गरबा रात्री सुंदर पोशाख आणि मेक-अपसह परफेक्ट दिसण्यासाठी; नवरात्री आणि गरब्याच्या धमाल मस्तीत, उष्णता आणि घामाच्या तणावातून मुक्त होण्याचा उत्तम उपाय म्हणजे वॉटरप्रूफ मेकअप करणे.



त्वचा हायड्रेट करा - सर्वप्रथम तुमची त्वचा ओलावामुक्त करा. यासाठी चेहरा नीट धुवा. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही तुमच्या चेहऱ्याला बर्फानेही मसाज करू शकता. मेकअप तुमच्या त्वचेवर जास्त काळ टिकण्यासाठी, १५ ते २० मिनिटांसाठी बर्फाने तुमच्या चेहऱ्याला हळूवारपणे मसाज करा. मसाज केल्यानंतर चेहरा हलक्या हाताने पुसून घ्या.

प्राइमर लावा - जर हवामान चिकट असेल आणि तुमचा मेकअप त्वचेवर राहिला असेल तर चेहऱ्यावर प्राइमर लावायला विसरू नका. डोळ्यांजवळ प्राइमर लावण्याची खात्री करा कारण ते काजल आणि लाइनर पसरण्यापासून रोखेल.

मॅट बेस्ड उत्पादने वापरा - लिक्विड फाउंडेशन फार काळ टिकत नाही. पाण्याच्या संपर्कात येताच ते तुमच्या त्वचेतून धुतले जातात. त्यामुळे, मॅटवर आधारित उत्पादने तुमच्या चेहऱ्यावरील तेल शोषून घेतात, ज्यामुळे चेहरा स्वच्छ आणि चमकदार दिसतो.

वॉटर प्रूफ आय लाइनर आणि काजल - डोळ्यांवर नेहमी स्मज प्रूफ आणि वॉटर प्रूफ आय लाइनर लावायचे लक्षात ठेवा. तुम्ही काजलमध्ये जेल लाइनर वापरू शकता, ते जास्त काळ टिकतात. यामुळे काजल आणि लाइनर फिकट होण्यापासून बचाव होईल.

मेकअप स्प्रे - मात्र, मेकअप स्प्रेचा जास्त वापर करू नये. पण गरबा करताना चेहऱ्यावरील मेकअप पुसून जाऊ नये म्हणून मेकअपनंतर मेकअप स्प्रे वापरावा. यामुळे तुमचा मेकअप तुमच्या त्वचेवर बराच काळ टिकून राहील.

# परिवर्तन महाशक्ती प्रयोग यशस्वी होईल काय ?

महाराष्ट्र देशा निवडणुकांचा देशा असेच काहीसे वातावरण प्रत्येक निवडणुकीत दिसून येते.भोळ्या भाबड्या,संधीसाधू,आपले अमूल्य मतांचा सौदेबाजी करून काही नोटांसाठी स्वतःची अमूल्य किंमत मातीमोल किमतीत विकणारे मतदार,सुशिक्षित मतदान न करणारे ह्या महाराष्ट्रात जन्माला आले हे महाराष्ट्राचे दुर्दैव म्हणावे लागेल. सत्ता संपत्तीसाठी कोणत्याही थराला जाणारे राजकारण्यांचे वारे माप पीक शेतकऱ्यांच्या पिकापेक्षा तरारून उठले.शेतकरी अति झाले,असहाय झाला कि,आत्महत्या करतो पण,शेती करण्याचे सोडत नाही म्हणून देशाला न बोलता लुटणाऱ्या शहाणा चतुर अडाणी,अंबानी,सोवळे ओवळे आणि भ्रष्ट लोकांच्या ताटात पोटाची खळगी भरणारे अन्न विराजमान होते. हेच काय ते आपल्या राज्याचे मोठे भाग्य.आहे.आज निवडणुकीच्या निमित्ताने सर्व राजकारणी शेतकरी, बेरोजगारी, महागाई ह्यावर तावातावाने एकमेकांवर चिखलफेक करताना दिसतात पण, प्रत्यक्ष कोणीही त्याची गांभीर्याने दखल घेत नाही हि खरी वस्तुस्थिती आहे. निवडणूक संपल्या,सत्ता स्थापन झाले कि सत्ताधारी मिळेल त्या मार्गाने दामदुप्पट ओरबाडण्याचे काम जोमाने सुरु करतो.



राज्यात तीन तीन पक्षांचे दोन युतीचे पक्ष सध्या जोमात आहेत. सत्तेची गणिते जुळवताना स्वतःचा व पक्षाचा फायद्यासाठी एकमेकांवर कुरघोड्या करण्याचे कारस्थान जोरात सुरु आहे. कुंपणावरचे लालची सत्तेसाठी कोणत्याही थराला जाणारे बेडूक अधाश्याप्रमाणे संधी शोधण्याचे महान कार्यात मग्न आहेत. छत्रपती संभाजी राजे,राजू शेट्टी,बच्चू कडू सारखे शेतकऱ्यांचा,दिन दुबळ्यांचा कैवार घेणारे,राज्य हिताचा विचार करणारे,भ्रष्टाचाराचा लेप नसलेले,निस्वार्थी प्रामाणिक अशी ज्यांची जनमानसात प्रतिमा आहे त्यांनी परिवर्तन महाशक्तीची स्थापना करून आघाडी युती पुढे आव्हान निर्माण करण्याचा मनोदय वाखाणण्याजोगा असला तरी तो तडीस जाईल काय ?छोटे छोटे पक्ष एकत्र आले तरी प्रत्यक्ष जागेवरून सुंदोपसुंदी होणार नाही ह्याची शाश्वती काय ह्याचा विचार केला असेल काय ?जरांगे पाटील ह्यांनी स्वतंत्र मोर्चेबांधणी केली तर निवडणुकीच्या राजकारणाला वेगळे वळण लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.प्रकाश आंबेडकर हे स्वतंत्रपणे उमेदवार देण्याच्या विचारांचे असून त्यांनाही सत्ता आणण्याची मनीषा असणार पण त्यात ते यशस्वी होतील काय ?तर उत्तर नाही असेच असेल,राज ठाकरे यांच्या मनसे पक्षाची तर त्रेधा तिरपट उडून एकही आमदार निवडून येण्याची शक्यता नाही ,कारण मतांचे होणारे विभाजन पाहता व बदललेले राजकीय वातावरण पाहता व संधीचा फायदा करून घेण्यासाठी प्रत्येक पक्ष फुटण्याच्या मार्गावर जाऊ शकतो.युती आघाडीत जागेवरून जाणीवपूर्वक बिघाड होऊन पक्ष फुटले तर त्याचा फायदा सत्ता स्थापनेसाठी फक्त काँग्रेस व भाजप हेच पक्ष बहुमताकडे वाटचाल करू शकतात.भाजपने देशात तर शिंदे सरकारने राज्यात मतांची बेगमी करण्यासाठी विविध आर्थिक आरोग्य शैक्षणिक,उद्योग ह्याची मतदारांना आकृष्ट करणारी वारेमाप प्रसिद्धी सुरु केली आहे.त्याचा परिणाम मतांवर होऊ शकतो. काँग्रेसला हि जनाधार वाढताना दिसतो.खरी कसोटी हि विचारपूर्वक मतदान करणाऱ्या नागरिकांची आहे.



**यशवंत चव्हाण,**
**सीबीडी बेलापूर (नवी मुंबई).**

पान १ वरुन

## कर्मयोगी अंकुशराव ...

संजीवनी तडेगावकर, प्रतिभा श्रीपत, रत्नमाला मोहिते,पंढरीनाथ सारके,सुनील लोणकर, राम कदम, विठ्ठल काष्टे, विद्या दिवटे, सुहास सदाव्रते,मंगल धुपे,

प्रभाकर शेळके,पंडीत रानमाळ, राम रौनेकर, विजय कुमठेकर, नारायण खरात,अशोक डोरले,शशिकांत पाटील,कैलास भाले,सत्यशिला तौर,रेखा गतखणे,दिगंबर दाते,पांडुरंग गिराम, अशोक खेडकर, राज रणधीर,विनोद जैतमहाल, कैलास इंगळे, श्रीकांत गायकवाड, गणेश खरात, प्रदीप देशमुख, एकनाथ शिंदे, दीपक राखुंडे, विजय जाधव यांचा साहित्य सेवा गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. तरी जिल्ह्यातील साहित्यप्रेमी,रसिक वाचक आणि मत्स्योदरी शिक्षण संस्थेतील माजी विद्यार्थ्यांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे,असे यशवंतराव चव्हाण साहित्यिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानचे सचिव डॉ.बी.आर.गायकवाड, कार्यवाह प्रा.बसवराज कोरे, माजी विद्यार्थी प्रतिनिधी डॉ.यशवंत सोनुने यांनी कळविले आहे.

## चेस ऑलिम्पियाडमध्ये ...

श्रीनाथ नारायणन यांचा समावेश आहे. अर्जुन इरिगसी आणि डी गुकेश यांनी आपापल्या सामन्यांमध्ये विजय मिळवल्यानंतर आणि दुसऱ्या स्थानावर असलेल्या चीनला यूएसए विरुद्ध दोन गुणांचा फटका बसल्यानंतर भारताचे ऐतिहासिक सुवर्णपदक निश्चित झाले.

भारतीय संघाने स्पर्धेची स्वप्नवत सुरुवात केली आणि गेल्या सीझनमध्ये चॅम्पियन उझबेकिस्तानविरुद्ध बरोबरी साधण्यापूर्वी पहिले आठ सामने जिंकून चॅम्पियन संघ असल्याची ग्वाही दिली. २०२२ च्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारताने मायदेशात कांस्यपदक जिंकले. तर त्यांनी २०१४ मध्येही कांस्यपदकही जिंकले होते. बुडापेस्ट येथे सुरू असलेल्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये डी गुकेशने अमेरिकेच्या जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकाच्या फॅबियानो कारुआनाचा पराभव करून भारताचे ऐतिहासिक सुवर्णपदक जवळपास निश्चित केले होते. भारताने १०व्या फेरीच्या सामन्यात अमेरिकेचा २.५-१.५ असा पराभव केला होता.

बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये प्रत्येक फेरीत दोन संघ एकमेकांविरूद्ध भिडतात. जर एका संघाने फेरी जिंकली तर त्याला दोन गुण मिळतील, आणि जर तो सामना अनिर्णित राहिला तर त्याला एक गुण मिळेल. या कारणास्तव भारताचे १० फेऱ्यांनंतर एकूण १९ गुण आहेत. सलग ८ फेऱ्या जिंकून भारताचे एकूण १६ गुण झाले. पण ९व्या फेरीत भारताला उझबेकिस्तानसोबत ड्रॉ खेळावा लागला, त्यामुळे भारताच्या खात्यात आणखी एक गुण जमा झाला आणि एकूण १७ गुण झाले. अमेरिकेला पराभूत केल्यानंतर संघाने १९ गुणांसह पहिले स्थान मिळविले.



**एमजीएम छत्रपती संभाजीनगरच्या वतीने मुंबई येथील कवियत्री शिल्पा देशपांडे यांना कविता गौरव राज्यस्तरीय पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कृषिधन विजय अण्णा बोराडे, भगवानराव काळे, प्राचार्य अंबादास कायंदे, प्रा जयराम खेडेकर, ज्ञानेश्वर भांदर्गे, सुभाष कोळकर, हरिहर शिंदे (छाया- अनिल व्यवहारे)**

# बबलू चौधरी यांचा भुखंड घोटाळा; लाखोंचा अपहार

## देसार परिवाराचा उपोषणाचा ईशारा

**जालना । प्रतिनिधी -** भुखंड घोटाळा करत लाखोंचा अपहार करणाऱ्या रुपकुमार उर्फ बबलू चौधरी यांच्याकडून जागा, दुकाने खाली करुन घेत त्यांच्याकडून शासनाची झालेली नुकसान भरपाई करुन घेण्यात यावी अशी मागणी करत कारवाई न झाल्यास येत्या २ ऑक्टोबर पासून जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचा इशारा देसार परिवाराच्यावतीने देण्यात आला आहे.

यासंदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, रुपकुमार उर्फ बबलू नेहरुलाल चौधरी यांनी नगराध्यक्षपदाची जबाबदारी स्विकारल्यानंतर २८ फेब्रुवारी २००१ रोजी दोन भुखंडाचे एकत्रित ठराव घेऊन बनावटरित्या स्व. नेहरुलाल खुशालभाऊ चौधरी या नावाने एक संस्था व्यायाम, क्रिडा व शिक्षण प्रसारक मंडळ दाखवत सिटी सर्व्हे नंबर ३३२/अ/१६ ज्याचे एकून क्षेत्रफळ ५६० चौरस मीटर म्हणजेच ६०२५ चौरस फूट हि सरकारी जागा (ओपन स्पेस) आपल्या पदाचा गैरवापर करून नगरपरिषद अधिकारी कर्मचारी यांच्यावर दबाव आणून व संगनमत करून आपल्या चार भावांच्या नावावर प्रसारक मंडळाच्या नावे ताब्यात घेतली. या जागेवर बेकायदेशीररित्या दुकाने काढून ती दुकाने भाड्याने देत लाखो रुपयांची वसुली करण्यात आली आहे आणि अद्यापही ही वसुली सुरु असल्याचा आरोपही निवेदनाद्वारे करण्यात आला आहे.

तसेच बबलू चौधरी यांनी पासी समाजाचे अध्यक्ष असतांना काद्राबाद येथील पासी समाजाचे असलेले कार्यालयाची जागा बेकायदेशररित्या आपल्या अध्यक्ष पदाचा वापर करत आपले चुलत भाऊ भगीरथ चौधरी यांच्या नावे केली. मामा चौक येथील पासी समाज विकास मंडळाची तीन मजली इमारत पासी समाज विकास मंडळाचे नाव कमी करून बबलू नेहरुलाल चौधरी अध्यक्ष पासी समाज असे बनावट दस्तावेज करून स्वतः चे नावे करून घेतली व त्यापासून जवळपास दोन लाख रुपये भाडे वसुली सुरु आहे. या सर्व भूखंड घोटाळ्याच्या विरोधात विविध कार्यालये व न्यायालयात तक्रारी दाखल असून न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. असे असतांनाही महानगरपालिका व विविध कार्यालयात दिलेल्या अर्जावर अजून कुठलीही ठोस कारवाई झालेली नाही.

महानगर पालिकेच्या कारभाराला कंटाळून जालना जिल्हाधिकारी जालना कार्यालयासमोर संपूर्ण कुटुंबियांसह येत्या २ ऑक्टोबर २०२४ रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त उपोषणास बसण्याचा ईशारा राजेश बाबुलाल देसार यांनी दिला आहे. उपोषणादरम्यान ईजा, नुकसान, किंवा मारहाण झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी ही आपली राहणार असल्याचेही निवेदनाच्या शेवटी म्हटले आहे.

या निवेदनावर राजेश बाबुलाल देसार यांच्यासह दीपक राजेश देसार, सविता देसार, मंथन देसार, रानी देसार, कृष्णा देसार, गीता देसार, आकाश नवलख, राजेश नवलख, सोनू नवलख, कपिल नवलख, नितीन भतानेकर, मोहन परदेशी, उमेश भदनेकर, जीवन चौधरी, मानसिंग नवमहालकर, किशार नवमहालकर, दीपक नवमहालकर, अलका देसार, सुंदरलाल भदनेकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# श्री महाराजा अग्रसेन जयंती निमित्त विविध कार्यक्रम उत्साहात



**जालना । प्रतिनिधी -** श्री अग्रसेन महाराज यांच्या जयंतीनिमित्त येथील अग्र युनिक ग्रुपच्या वतीने श्री अग्रसेन फाउंडेशन येथे विविध प्रतियोगिता आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री महाराजा अग्रसेनची आरती सौ. शोभा हरिप्रसादजी देवीदान, सौ. संगीता विशालजी अग्रवाल, सौ. अनिता आनंदजी अग्रवाल, सौ. जयश्री सतीशजी अग्रवाल, सौ.मीरा संदिपजी अग्रवाल, सौ . श्रध्दा जिंदल आणि अग्र समाजातील विविध ग्रुपचे पदाधिकारी यांच्या हस्ते करत कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली

या कार्यक्रमातर्गत विशेषतः महिला सशक्तिकरण व महिला सुरक्षातेचा संदेश देणे आणि महिलांना त्यांच्यातील कलांना प्रतिसाद मिळण्या हेतूने विशेष, पोस्टर मेकिंग रांगोळी स्पर्धा, फैंसी ड्रेस, नृत्य स्पर्धा सोबत रामायण तंबोला, करवा चौथ थाळी, फेस पेंटिंग, डायट फूड, रील मेकिंग, नो गॅस कुकिंग, चित्रकला स्पर्धा ,आदी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले

त्यात समाजातील महिलांनी आणि मुलांनी उस्फुर्तपणे मोठ्या संख्येत सहभाग नोंदविला

अग्र युनिक ग्रुप जालना तर्फे वर्षभरातही निरंतर अग्र समाज बांधवांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येते.

या आयोजनाच्या सफलतेसाठी सौ. प्रीति अग्रवाल,सौ. शितल अग्रवाल, सौ. पूनम बारंजलावाला,सौ. वीं अश्विनी धन्नावत, सौ. रिटा मित्तल, सौ. मंगल अग्रवाल, सौ. जया गोयल,सौ. सरिता पंच, सौ. भाग्यश्री अग्रवाल, सौ. भारती गजबी सौ. वंदना देवीदान, आणि ग्रुपच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# द्विज गादेवाड ने राष्ट्रीय तायक्वॉंदो स्पर्धेत सुवर्ण पदक पटकवला




**जालना । प्रतिनिधी -** तायक्वॉंदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (कल्याण) च्या आयोजन मधे तसेच इंडीया तायक्वॉंदो च्या अधिपत्या खाली नाशिक येथे सुरु असलेल्या चैंपियन ऑफ चैंपियन राष्ट्रीय तायक्वॉंदो स्पर्धे मधे जालना येथील द्विज गादेवाड ने सुवर्णपदक पटकवला आहे सुवर्णपदक पटकवल्याने त्याच भारतीय संघात निवड साठी च मार्ग मोकळा झाला आहे आगामी काळात भारता च्या संघात तो आपल्या ला निश्चित खेळताना दिसेल अशी आशा तायक्वॉंदो असोसिएशन जालना जिल्हा चे अध्यक्ष श्री अरविंद देशमुख यांनी व्यक्त केली आहे आणि या यशा बद्दल त्याचे अभिनदन केले द्विज गादेवाड हा राष्ट्रीय खेळाडू सचिन गादेवाड यांचे मार्गदर्शना खाली माघील ३ वर्षा पासून सतत तायक्वॉंदो चा सराव करत आहे आणि या पदक पटकवल्या बद्दल संघटने चे सचिव सचिन आर्य खजिंदार अशोक पडुळ,प्रा.डॉ. विजय कमले पाटिल, धनसिंग सूर्यवंशी, मा नगरसेवक रमेश जाधव, राष्ट्रीय पंच व खेळाडू मयूर पिवल, ज्ञानेश्वर मोरे, प्रतिक ढाकने, प्रांजल पिवल आदिनी कौतुक केले

# आयुर्वेद हे विश्वगुरू भारतासाठी सर्वोत्तम साधन- आरोग्य संघटना

## डॉ. खैरे यांनी घेतली आयुषमंत्र्यांची भेट



**बदनापूर । प्रतिनिधी -** भारत आरोग्य संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि बदनापूर डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अरुण खैरे आणि इतर अधिकार्यांनी केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांची २२ सप्टेंबर रोजी भेट घेतली आणि आयुर्वेदाच्या विविध पैलूंवर सविस्तर चर्चा केली. आयुष मंत्री जाधव यांच्या यशस्वी नेतृत्वाखाली आयुर्वेदाचा सर्वांगीण विकास झाल्याबद्दल संस्थेने मंत्री जाधव यांचे आभार मानले आणि विशेषतः पुढील परीक्षेत सुधारणा करण्याच्या संदर्भात केलेल्या कार्याबद्दल त्यांचे आभार मानले. केंद्रीय आयुष मंत्री जाधव यांनी संस्थेच्या कार्याची प्रशंसा करून अभिनंदन करत आयुर्वेदाच्या विकासासाठी तुम्ही सर्वांनी जबाबदारीने काम करत राहावे. मी तुम्हाला खात्री देतो की आयुर्वेदाच्या प्रगतीसाठी भारत आरोग्य संघटनेला आवश्यक असलेल्या कोणत्याही प्रकारची मदत आयुष मंत्रालय देईल. आपण सर्वांनी मिळून आयुर्वेदाला जगातील सर्वात लोकप्रिय वैद्यकीय प्रणाली म्हणून प्रस्थापित करायचे आहे, असे जाधव म्हणाले. यावेळी भारत आरोग्य संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अरुण खैरे, उपाध्यक्ष डॉ. अजय सिंह, राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. सत्यप्रकाश चौहान आदींची उपस्थिती होती.

# विद्यार्थी वार्षिक गुणगौरव व प्रतिथयश व्यक्तींचा सत्कार सोहळा उत्साहात



**डोंबिवली । प्रतिनिधी -** सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणा-या संकल्प सिध्दी सातारा संघाचा३७वा विद्यार्थी वार्षिक गुणगौरव व प्रतिथयश व्यक्तींचा सत्कार नुकताच सर्वेश सभागृह डोंबिवली पुर्व येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. २आक्टोबर१९८७साली संस्थेची स्थापना झाली. आजपर्यंत अनेक आजी माजी अध्यक्ष, सचिव, खजिनदार, सभासद यांनी संस्थेच्या वृध्दीसाठी मेहनत घेतली आहे.संस्था गेली ३७वर्षे डोंबिवलीत कार्यरत आहे. या सोहळ्यास संस्थेचे अनेक सभासद सहकुटुंब उपस्थित होते. संस्थेच्या माध्यमातून आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, पूरग्रस्तांना मदत, दुष्काळ ग्रस्तांना मदत असे अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. संस्थेने दशकपुर्ती व रौप्यम होत्सव साजरे केले आहेत. डोंबिवलीतील सातारकरांच्या १५पतसंस्था, चार सहकारी बँका अनेक उद्योग हे संस्थेशी संलग्न आहेत.अनेक राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, उद्योग व्यवसाय प्रमुखांनी संस्थेला भेटी दिल्या आहेत. संस्थेचे एकुण१५००परिवार सभासद आहेत. अनेक उच्चपदस्थ अधिकारी संस्थेचे कार्यकारिणी सदस्य आहेत. संपुर्ण महिला आघाडी व अध्यक्षा सौ. राजश्री कराळे ह्या महिला आघाडीचे वर्षभर अनेक समाजोपयोगी कार्यक्रम राबवत असतात. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उपविभागीय अधिकारी कल्याण विश्वास गुजर व सौ. निशा गुजर यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सांस्कृतिक कार्यक्रमातील मुलांनी उत्कृष्ट नृत्य सादर केली. संस्थेतील अनेक मुल आयआयटी, एमबीबीएस, एमटेक, सिए अशा पदावर उत्तीर्ण झाल्याने त्यांचे कौतुक करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष प्रविण कराळे यांनी संस्थेच्या सदस्यांचा मनातील डोंबिवलीत सातारा भवन व्हावे ह्या साठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे आवाहन केले. संस्थेचे सचिव दत्तात्रय फडतरे यांनी प्रास्ताविका मध्ये संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी माहिती दिली. खजिनदार विशाल शिंगटे, महिला आघाडी अध्यक्षा सौ. राजश्री कराळे, चंद्रकांत शेलार, अनिल निकम, संजय गायकवाड, नितीन जाधव, ज्ञानेश्वर चव्हाण, सुभाष कांबिरे, प्रकाश सणस, सौ. शर्मिला निकम, सौ. जयश्री चव्हाण व संपूर्ण महिला आघाडी,कार्यकारिणी सदस्यांनी महिनाभर मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. संस्थेच्या अनेक सभासदांनी भरघोस देणगी जमा करुन सहकार्य केले.

# माजी आमदार वजाहत मिर्झा यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**जालना । प्रतिनिधी -** माजी आमदार तथा काँग्रेसचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष वजाहत मिर्झा यांचा आज शनिवार दुपारी १ वाजता वाढदिवस साजरा करण्यात आला आहे त्यांच्या वाढदिवसानिमित्त शहीद एहसान जाफरी स्कुलमध्ये कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमात वजाहत मिर्झा यांच्या दीर्घायुष्यासाठी विदयार्थीयांनी प्रार्थना केली व विदयार्थीयांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष तथा काँग्रेसचे अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष अब्दुल रफिक, प्रदेश सरचिटणीस राम कुऱ्हाडे, चंद्रकांत रत्नपारखे,

अंबड तालुका अध्यक्ष सय्यद जावेद नवाब, परतूर तालुका अध्यक्ष असिफ जमिनदार, उपाध्यक्ष अल्पसंख्याक शेख रिजवान यांच्या सह जिल्यातील अल्पसंख्याक पदाधिकारी यांची उपस्थिती होती.



# सिंचनासाठी हक्काच्या मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेचा शेतकरी बांधवानी लाभ घ्यावा - ॲड. शंकर चव्हाण

**बीड । प्रतिनिधी -** महाराष्ट्रातील तमाम शेतकरी बांधवांनी शेतामध्ये सिंचनासाठी हक्काच्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या वतीने सुरु असलेली



मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन ड. शंकर चव्हाण यांनी केले आहे. तसेच सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ऑनलाईन प्रणालीमार्फत अर्ज सादर करुन लाभा घ्यावा असेही ड. शंकर चव्हाण यांनी सर्व शेतकरी बांधवाना प्रसिध्दीपत्राकाच्या माध्यमातून आवाहन केले आहे. सदर योजनेसाठी लागणारे निकष हे महावितरण कंपनीने निश्चित केलेले असून, ५ एकरपर्यंत शेतजमीनधारक असणाऱ्या शेतकऱ्यांस ३ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतचा सौर कृषी पंप, २.५१ ते ५ एकर पर्यंतच्या शेतकऱ्यांस ५ अश्वशक्ती क्षमतेचा आणि एकरवरील शेतजमीनधारक शेतकऱ्यांस ७.५ अश्वशक्तीची क्षमता असलेला सौर कृषी पंप दिला जाईल. अधिक माहितीसाठी शेतकरी बांधवानी तात्काळ सीएससी किंवा महाऑनलाईन केंद्राशी किंवा ऑनलाईन संकेतस्थळावर जाऊन संपर्क साधून त्याबाबत सखोल माहिती घेऊन कागदपत्रांची पूर्तता करावी व या योजनेचा लाभ घ्यावा. या योजनेची माहिती https:// mahadiscom.in/solar या संकेतस्थळावरीही सविस्तर दिली गेली आहे. सदर योजना ही शेतकरी बांधवांसाठी वरदान आहे कारण यामध्ये लोडशेडींची कसल्याही प्रकारची कटकट नसणार आहे शिवाय नेहमी नेहमी होणाऱ्या विद्युत पुरवठा खंडीत होणाऱ्या लपंडावापासून आता सुटका मिळणार आहे.

सदर सौरकृषीपंपाचे दिवसा शेतीपंपास वीजेची उपलब्धता, दिवसा विनाव्यतय अखंडित वीज पुरवठा, वीज बिलापासून मुक्तता, डिझेल पंपाच्या तुलनेत शून्य परिचलन खर्च, पर्यावरण पुरक परिचलन, शेती सिंचनाचा भाग वीज सबसिडीपासून पृथ्थकरण करणे तसेच औद्योगिक, वाणिज्यिक व घरगुती वीज ग्राहकांवरील क्रास सबसिडीचा बोजा कमी करणे असे विविध फायदे आहेत. शिवाय योजनेची ठळक वैशिष्टे पारेषण विरहित १ लाख सौरकृषी पंप टप्प्या टप्प्यात उपलब्ध करुन देणे व सौर कृषीपंपासोबत दोन डि. सी. एल.ई.डी बल्ब, मोबाईल चार्जिंग व बॅटरी चार्जिंगची सुविधा (बॅटरी लाभार्थीनी घ्यावी) यांचा समावेश करण्यात आला आहे.

राज्यात 'अटल' सौर कृषीपंप योजना राबविण्यासंदर्भात घेतलेल्या निर्णयासमवेत राज्य शासनाने १ लक्ष पारेषण विरहीत सौर कृषीपंप आस्थापित करण्यासाठी 'मुख्यमंत्री' सौर कृषीपंप योजना राबविण्यास शासन निर्णय क्र. सौरप-२०१८/प्र.क्र.४०१/उर्जा-७,दि.१५ नोव्हे.२०१८ अन्वये मंजूरी दिली आहे. या योजनेत सौर कृषीपंप ३ वर्षांच्या कालावधीत टप्याटप्यात आस्थापित करण्यात येणार आहेत. प्रत्येक टप्पा प्रत्यक्ष सुरु झाल्यापासून पुढील १८ महिन्यात पूर्ण करावयाचा असून प्रथम टप्यात २५,0000 नग सौर कृषीपंप आस्थापनेचे उदिदृष्ट देण्यात आले आहे. पहिला टप्पा - २५000 नग, दुसरा टप्पा - ५0000 नग, तिसरा टप्पा - २५000 नग असा आहे.

# बालकल्याण समितीच्या अध्यक्षा विरूध्द कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी -** सौ दाऊद.... एक राऊत हा सोशल मीडियावर प्रसिद्ध असलेल्या डायलॉगची नक्कल करून बालकल्याण समितीच्या महिला सदस्यांशी अश्लील वर्तन करून, दादागिरी करणे जालना येथील बालकल्याण समितीचा अध्यक्ष एकनाथ वैजिनाथ राऊत याला चांगलेच महागात पडलं आहे.

बालकल्याण समितीच्या एका महिला सदस्यांच्या फिर्यादीवरून कदीम जालना पोलिसांनी एकनाथ राऊत याच्याविरुद्ध दि.२० शुक्रवार रोजी सव्वा तीन वा.च्या सुमारास बालकल्याण समीतीच्या सदस्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहितेच्या ७५, २९६, ७९, ३५२, ३५१(२) (३) कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आसल्याची माहीती दि.२१ शनिवार रोजी सकाळी दहा वा.दरम्यान पोलीस सुत्राकडून प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळवण्यात आली आहे.




बालकल्याण समितीचा अध्यक्ष एकनाथ राऊत यांच्या अश्लिल आणि अरेरावीच्या वेगवेगळ्या कृत्याबाबत समितीच्याच महिला सदस्यांनी जिल्हाधिकारी आणि जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी यांची भेट घेऊन गंभीर स्वरूपाच्या तक्रारी केल्या होत्या.

राऊत याचे हे कारनामे मागील वर्षीच्या डिसेंबर महिन्यापासून सुरूच होते, त्यामुळे महिला सदस्या त्रस्त झाल्या होत्या.

कार्यालयात असतांना राऊत हा महिला सदस्यासमोर अश्लील आणि रोमँटिक गाणी लावून, अश्लील हावभाव करीत मनाला लज्जा वाटेल, असे कृत्ये करीत असल्याचे फिर्यादीने म्हटले आहे.

याशिवाय, तुम्ही माझ्या मनासारखे वागले नाही तर तुमचे पगार पत्रक पाठवणार नाही, तुम्ही तक्रार केली तर बरबाद करून टाकेल, माझे कोणीही वाकडे करणार नाही, असे तो धमक्या देत होता.

दरम्यान, राऊत याच्या अश्लील आणि मनमानी कारभाराने कळस गाठल्याने आज अखेर महिला सदस्यांनी वज्रमुठ करून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, या गुन्ह्याच्या पार्श्वभूमीवर उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सिद्धार्थ माने, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानदेव नागरे यांनी बालकल्याण समितीच्या कार्यालयास भेट देऊन पंचनामा केला आहे.

पुढील तपास पो.उपनिरि.नागरे हे करीत आहेत.

## हलक्या जमिनीवरील कपाशीने टाकल्या माना!

### भोकरदन तालुक्यात पावसाची प्रतिक्षा



**भोकरदन । तडेगाव । प्रतिनिधी** - भोकरदन तालुक्यात तसेच तडेगाव नळणी परिसरात मागील काही दिवसांपासून पाऊसाने उघडीप दिली आहे .यापूर्वी सुद्धा पाहिजेत तसा परिसरात पाऊस न झाल्याने बहुतांश शेतातील कपाशी पीक सुकु लागले माना टाकु लागले आहेत जर दोन तीन दिवस पाऊस उशीरा पडला तर कपाशी पीक सुकण्याची शक्यता शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहेत. सध्या हलक्या जमिनीवरील पीक मोठ्या प्रमाणात सुकताना दिसत आहेत पाहीजे तसा पाऊस न झाल्याने विहीरीचीही पाणी पातळी वाढली नाही आहे .याशिवाय विजेचा प्रश्न सुद्धा शेतकऱ्यांना भेडसावत आहेत. अश्या परिस्थितीत कपाशीचे पीक ओलवण्याचे मोठे आव्हान शेतकर्यांन समोर आहेत. माळावरील जमिनीवर अधिक शेतकरी ठिबक सिंचनाशिवाय कपाशीची लागवड करतात अश्या वेळी कपाशीचे पीक ओलवण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या पाऊसाची आवश्यकता असती. पाऊसाने उघडीप दिल्याने पातेगळ ही होत आहेत जर पाऊस लवकर आला नाही तर कपाशीचे परिसरातील पीक वाया जाण्याची चिंता शेतकरीवर्गात आहे. जर परिसरात जोरदार पाऊस झाला नाही तर हातातोंडाशी आलेले पीक वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहेत पंधरा दिवसांपुर्वी तालुक्यात तसेच परिसरात हलक्या स्वरूपाचा पाऊस झाला त्यामुळे विहीरी ही पुर्ण क्षमतेने भरल्या नाहीत आता शेतकरी विहिरीतून उपसा करून कपाशी पीकाला सिंचनाद्वारे पाणी सोडताना दिसत आहेत.

# मानवी जीवनमूल्य सांगणारी महाचिंतनी यंदा जालन्यात

### स्वागताध्यक्षपदी अर्जुनराव खोतकर यांची निवड

**जालना । प्रतिनिधी -** शासनाचा ज्ञानोबा तुकोबा पुरस्कार प्राप्त महंत प.पू. बाभूळगावकर शास्त्री यांच्या संकल्पनेतील महाचिंतनी कार्यक्रम यावर्षी जालना शहरात होत आहे. माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांची स्वागताध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली असून जानेवारीत होणाऱ्या या कार्यक्रमाची पूर्वतयारी बैठक नुकतीच पार पडली. महाचिंतनी कार्यक्रमाचे हे २८ वे वर्ष आहे. येथील संजीवनी हॉस्पिटलचे संचालक डॉ. बळीराम बागल हे प्रमुख संयोजक आहेत. महाचिंतनी कार्यक्रमात सर्वज्ञ श्री. चक्रधर स्वामी यांच्या समता, ममता आणि जीवनमूल्य विषयक विचारावर प्रबोधन केले जाते. याशिवाय महाचिंतनी मध्ये वारकरी संप्रदाय,हिंदू , लिंगायत, बौद्ध, जैन, मुस्लिम आदी सर्व



धर्मीय तत्त्ववेत्ते व विचारवंतांना आमंत्रित केले जाते. तसेच सर्व पक्षीय लोकप्रतिनिधींना देखील निमंत्रित करण्यात येते.यंदाही प्रख्यात विचारवंतांना आमंत्रित केले जाणार आहे. महाचिंतनी म्हणजे एक वैचारिक मेजवानीच असते. ९ ते ११ जानेवारी दरम्यान हा कार्यक्रम जालना येथे होणार आहे. सामनगाव रोडवर स्थळ पाहणी देखील करण्यात आली आहे. विविध संयोजन समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. सुमारे २५ हजार लोक महाराष्ट्रातून या कार्यक्रमास तीन दिवस आवर्जून उपस्थित राहतात. पूर्वतयारी बैठक स्वागताध्यक्ष अर्जुनराव खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संजीवनी हॉस्पिटल मध्ये पार पडली. यावेळी प.पू. बा.भो. शास्त्री यांच्यासह शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, सुदाम बाबा शास्त्री, माधवराज दादा फलटणकर, डॉ. बळीराम बागल, शिवसेनेचे शहर प्रमुख आत्मानंद भक्त, ज्येष्ठ पत्रकार गुलाबराव पाटील, विश्वंभर भुतेकर, एड. योगेश अक्कर, आबासाहेब मते, अनिल भालेकर, रामेश्वर कोल्हे, गोरख कावळे, सुभाष कदम, आजिनाथ सुरवसे, रवींद्र घनगाव, राहुल गवारे, अरुण काकडे आदी प्रमुख उपस्थित होते. या बैठकीचे संचालन सुदामबाबा शास्त्री यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. बळीराम बागल यांनी मानले.

## ‘दिलखुलास’ कार्यक्रमात विजय जोशी यांची मुलाखत

**मुंबई -** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित ‘दिलखुलास’ कार्यक्रमात अमृत संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना आणि उपक्रम या विषयावर महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांची मुलाखत प्रसारित होणार आहे.

राज्य शासनाने खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवक व युवतींना शैक्षणिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतला. यासाठी महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी म्हणजेच ‘अमृत’ या स्वायत्त संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेची कार्यपद्धती तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी करण्यात येत असलेले प्रयत्न याबाबत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक श्री. जोशी यांनी ‘दिलखुलास’ कार्यक्रमात माहिती दिली आहे.

‘दिलखुलास’ कार्यक्रमात ही मुलाखत सोमवार, दि. २३, मंगळवार दि.२४ आणि बुधवार दि.२५ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून व ‘न्यूज ऑन एआयआर’ या मोबाईल पवर प्रसारित होणार आहे. निवेदक श्रीदत्त गायकवाड यांनी ही मुलाखत घेतली आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.